# प्रेस नोट

दिनांक - ०४/१०/२०२४

## कर्ज मिळवुन देतो असे खोटे सांगुन ग्राहकांची फसवणूक करणारे व प्रतिबंधीत औषधे विक्री करण्याचे अमीष दाखवून परदेशी नागरीकांची फसवणूक करणारे एकूण ०३ बेकायदेशीर कॉल सेंटरवर मुंबई गुन्हे शाखेकडून कारवाई.

---

मुंबई गुन्हे शाखा यांचे कक्ष-१० व कक्ष-१२ यांना गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की, काही इसम हे बेकायदेशीर कॉल सेंटर चालवून कर्ज मिळवुन देतो असे खोटे सांगुन ग्राहकांची फसवणूक करतात. तसेच प्रतिबंधीत औषधे विक्री करण्याचे अमीष दाखवून परदेशी नागरीकांची फसवणूक करत आहेत. त्यानुसार कक्ष-१० व कक्ष-१२ यांनी वेगवेगळी पोलीस पथके तयार केली व मिळालेल्या माहिती नुसार ओशीवरा पोलीस ठाणे, आरे सब पोलीस ठाणे, मुंबई यांचे हद्दीत सापळा रचून छापा टाकला असता,

कक्ष-१० यांनी ओशिवरा पोलीस ठाणेच्या हद्दीत (१) गेट फार्मासी एल.एल.पी, पत्ता - रेंज हाईटस, रू.नं. ११०५, अे विंग, बेहराम बाग, लिंक रोड, जोगेश्वरी पश्चिम, मुंबई. (२) ऑल विन इन्फो मिडीया प्रा. लि., पत्ता - रेंज हाईटस, रू. नं. ८०२, ८ वा माळा, अे विंग, बेहराम बाग, लिंक रोड, जोगेश्वरी पश्चिम, मुंबई. येथे दोन बोगस कॉल सेंटर मिळून आले. त्याठिकाणी इंटरनेटद्वारे व्हीओआयपी कॉलद्वारे परदेशी नागरिकांच्या संपर्कात येवून परदेशी नागरीक असल्याचे भासवून ऑनलाईन फार्मसी या खोटया कंपनीच्या माध्यमातुन बोलत असल्याचे सांगुन कॉल करुन खोटया नावाचा वापर करून व्हायग्रा, ट्रामाडोल, सिआलीस व लिवेट्रो इत्यादी भारतात प्रतिबंधित असलेली औषधे विकण्याचे अमिष दाखवुन त्यांची ऑर्डर घेवुन ऑनलाईन त्यांचेकडुन डॉलरमध्ये पैसे घेवुन महाराष्ट्र/केंद्र शासनाचा महसुल बुडवून फसवणुक करीत असल्याचे दिसून आले. तसेच कक्ष-१२ यांनी आरे पोलीस ठाणे हद्दीत, ऑफिस न. ५३५, मास्टरमाईंड ०१, रॉयल पाल्मस, सुमित अपार्टमेंट समोर, आरे कॉलनी, गोरेगाव पुर्व मुंबई येथे ''धनसुविधा फायनान्स'' या नावाची अनधिकृत फायनान्स कंपनी सुरू असुन नमुद कंपनी ग्राहकांना अनधिकृत कॉल सेंटरच्या माध्यमातून कॉल करून पर्सनल लोन व बिजनेस लोन मिळवुन देते असे सांगून प्रोसेसींग फी च्या नावाखाली पैसे घेवून ग्राहकांना कर्ज न देता फसवणुक करण्याकरिता अनधिकृत कॉलसेंटर चालविले जात असल्याचे मिळून आले.

सदरबाबत कक्ष-१० यांनी नमुद कारवाई मध्ये एकुण १२ संगणक, लॅपटॉपच्या हार्ड डिस्क, ०२ मोबाईल फोन, संगणकाला जोडलेले ६ हेडफोन माईक हे जप्त करून तेथील १० कॉलसेंटर सेल्स ऑपरेटर, ०२ मालक असे एकुण १२ आरोपीतांना अटक केली आहे. तसेच कक्ष-१२ यांनी नमुद कारवाईत ३३ मोबाईल, ०४ मॉनीटर व सीपीयु, राउटर व एक लॅपटॉप असे जप्त करून तेथील ०१ मालक, ०१ अकाउंटंट, २२ कॉलर/टिम लिडर (१४ पुरुष, ०८ महिला ) असे एकुण २४ आरोपीतांना अटक केली आहे. असे एकूण वर नमुद तीन बोगस कॉल सेंटरचे एकूण ३६ आरोपीतांना अटक करण्यात आलेली आहे.

सदरबाबत विहीत कलमांन्वये एकूण ०३ गुन्हे दाखल करण्यात आले असून सदर गुन्हयातील सर्व आरोपी यांना पोलीस कोठडी मिळणेकरीता मा. न्यायालयात हजर ठेवण्यात येत असून वर नमुद गुन्हयांचा पुढील तपास गुन्हे शाखेकडून करण्यात येत आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे), श्री. लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. शशि कुमार मीना, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१), श्री. विशाल ठाकूर, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त (डि-पश्चिम), श्री. प्रशांत राजे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त (डि-उत्तर), श्री. राजेंद्र शिरतोडे यांचे मार्गदर्शनाखाली, कक्ष-१० यांचे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. दिपक सावंत, कक्ष-१२, यांचे प्रभारी पोलीस निरीक्षक, श्री. नवनाथ जगताप, तसेच कक्ष-१० यांचे पो.नि. श्री. मनोज सुतार, सपोनि श्री. धनराज चौधरी, सपोनि श्री. गणेश तोडकर, सपोनि श्री. रोहित नार्वेकर, पो.ह. धारगळकर, पो.ह. श्री. माने, श्री. खरात, श्री. चवरे, श्री. शिंदे, श्री. पानसरे, पो.शि श्री. ठोंगरे, श्री. डफळे, श्री. निर्मळे, पो.शि स्वाती सोनवणे, पो.शि.चा. प्रकाश चव्हाण तसेच कक्ष-१२ यांचे पो.नि. बाळासाहेब राऊत, पो.नि. सचिन जाधव, सपोनि विजय रासकर, सपोनि मोहिते, सपोनि निलोफर शेख, सफौ. बागवे, सफौ. खान, पोह कल्पेश सावंत, पोह चव्हाण, पोह लिम्हण, पोह संतोष राणे, पोह बने, पोह मोरे, पोह बिचकर, पोह अमोल राणे, पोह गोमे, पोह गोरुले, पोह सोनावणे, पोशि धोत्रे, मपोशि वाघमारे, सफौचा सावंत, पोशिचा संकपाळ यांनी यशस्वीरित्या पार पाडली.